# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in


**कालमर्यादित :**
**दि.२९.०६.२०१९.**

जा.क्र.तंशिविकापु/विवि/गांधी जयंती/मे-२०१९/2500
दिनांक : 24 JUN 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या **सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित** / विना अनुदानित
पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी सस्था.
(पुणे विभागे)

**विषय :- राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त, माहे जून, २०१९ मध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमाचा दिनदर्शिकेसह अहवाल सादर करण्याबाबत.**

संदर्भ :- १. शासन परिपत्रक उ.व.तं.शि.विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र./४३/समन्वय, दि.१४/०९/२०१८
२. मा. संचालक, तं.शि.सं.म.रा.मुंबई यांचे परिपत्रक क्र : १६/गांधी जयंती/२०१८/५६१, दि.१७/०९/२०१८.
३. दिनांक २०/०६/२०१९ रोजी,, मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालयात झालेली बैठक.

उपरोक्त विषयाच्या संदर्भ क्रमांक १ व २ च्या परिपत्रकातील एकूण १४ मुद्यांच्या अनुषंगाने, तयार केलेल्या कृति आराखडयानुसार, राष्ट्रपिता महात्मा गांधी याच्या १५० व्या जयंतीनिमित्त आपल्या संस्थेत आयोजित केलेल्या कार्यक्रमाबाबतचा नियतकालिक अहवाल प्रत्येक महिन्याच्या २५ तारखेपर्यंत या विभागीय कार्यालयास सादर करण्याविषयी यापूर्वी कळविण्यांत आलेले आहे. **परंतु ब-याच शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांनी याविषयाची माहिती अद्यापि सादर केलेली नाही. सबब दिनांक २०.०६.२०१९ रोजी, मा. मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली मंत्रालय मुंबई येथे झालेल्या बैठकीत याबाबत नोंद घेण्यात आलेली आहे.**

तरी या परिपत्रकाव्दारे आपणांस सूचित करण्यात येते की, आपल्या संस्थेची वरील विषयाची माहिती सादर करावयाची असल्याने, या कार्यक्रमाबाबत तयार केलेल्या कृति आराखडयानुसार, माहे जून, २०१९ मध्ये आयोजित केलेल्या कार्यक्रमाबाबतचा अहवाल ऑनलाईन पध्दतीने **www.ropune.org.in या वेबसाईटवर इन्स्टिटयूट लॉगीन (Institute Login) मध्ये दि.२९.०६.२०१९ रोजी, दुपारी ०३.०० वाजेपर्यंत कार्यक्रमाच्या फोटोसहित भरण्यात यावी.** जेणेकरुन सदरचा एकत्रित अहवाल तंत्रशिक्षण संचालनालयास सादर करणे या कार्यालयास शक्य होईल.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.